Seat No.

Total No. of Pages : 10

# Ph.D. Entrance Examination

# MARATHI

# Subject Code: 58767

**Day and Date : Wednesday, 13/11/2024** **Total Marks : 100**
**Time : 01.00 pm to 03.00 pm**

**Instruction :**

1. All questions are compulsory.
2. Each question carries 2 marks.
3. Answers should be marked in the given OMR answer sheet by darkening the appropriate option.
4. Use black ball point pen only for marking the circle. Do not make any stray mark on the OMR Answer Sheet.
5. Follow the instructions given on OMR sheet.
6. Rough work shall be done on the sheet provided at the end of question paper.
7. Only non-programmable calculators are allowed.

**पुढीलपैकी योग्य ते पर्याय निवडा.**

१. संशोधकाने संशोधन करताना कोणती बाब प्रामुख्याने ध्यानात ठेवली पाहिजे?

अ) साधनांची उपलब्धता ब) मार्गदर्शकाची आवड

क) प्रतिष्ठा ड) आर्थिक निकड

२. मुख्य विषयाच्या अनुषंगाने अविशिष्ट राहिलेला मजकूर कोणत्या भागात देण्याची पद्धत आहे?

अ) टीपा ब) परिशिष्ट

क) सूची ड) तळटीपा

३. वस्तुनिष्ठतेवर कुरघोडी करणारा भाषाविलास संशोधनपर लेखनात कशा स्वरूपाचा असला पाहिजे?

अ) अस्पष्ट ब) सोयीचा

क) ग्राह्य ड) व्यर्ज

४. संशोधनाच्या अंतिम टप्प्यात निरीक्षणांची व निष्कर्षांची नोंद कोणत्या घटकात केली जाते?

अ) प्रास्ताविक  ब) साधनग्रंथ

क) उपसंहार  ड) संपादकीय

५. संशोधनाचा विषय निश्चित झाल्यानंतरचा मुख्य टप्पा कोणता असतो?

अ) शीर्षक  ब) उपसंहार

क) मुखपृष्ठ  ड) मलपृष्ठ

६. कोणत्या प्रकारच्या भाषेच्या उपयोजनामुळे संशोधनातील वस्तुनिष्ठता शबल होत जाते?

अ) वस्तुनिष्ठ  ब) आलंकारिक

क) समीक्षात्मक  ड) प्रमाण

७. इतिहास संशोधनात कोणते पायाभूत तत्त्व अनुस्यूत असते?

अ) पूर्वग्रह  ब) आत्मनिष्ठा

क) वस्तुनिष्ठा  ड) अभिनिवेश

८. श्रद्धा व मूल्यांचा शोध या स्वरूपाच्या अभ्यासाला कोणत्या नावाने संबोधले जाते?

अ) चरित्रात्मक संशोधन  ब) संस्कृतीकेंद्री संशोधन

क) मानवकेंद्री संशोधन  ड) वैज्ञानिक संशोधन

९. ताम्रपत्रे, दानपत्रे, राजाज्ञा, शिलालेख हे ऐतिहासिक संशोधनाचे कोणत्या प्रकारचे स्रोत आहेत ?

अ) दुय्यम  ब) ऐतिहासिक

क) प्राथमिक  ड) तौलनिक अभ्यासाचे

१०. समस्या निश्चिती, माहितीची जमवाजमव, माहितीची चिकित्सा, माहितीचे अर्थनिर्वचन, संशोधनाचे अहवाल लेखन या कोणत्या पद्धतीच्या संशोधनाच्या पायऱ्या आहेत?

अ) वर्णनात्मक  ब) तौलनिक

क) सर्वेक्षण संशोधन  ड) ऐतिहासिक

११. प्रबंध लेखनात एकच संदर्भग्रंथ जेव्हा पुनः पुन्हा येतो, तेव्हा कोणत्या शब्दाचा वापर नेहमी केला जातो?

अ) ग्रंथनाम
ब) निर्देश
क) संदर्भ
ड) तत्रैव

१२. गुंतागुंतीच्या समस्येची उकल करून समस्येचे अचूक निदान करणाऱ्या निबंध लेखनास काय म्हणतात?

अ) युक्तिवादत्मक निबंध
ब) विश्लेषणात्मक निबंध
क) नैदानिक निबंध
ड) खंडणमंडणात्मक निबंध

१३. व्यक्तीने आपले म्हणणे पूर्णपणे मोकळ्या पद्धतीने मांडण्याऱ्या प्रश्नावलीस काय म्हणतात?

अ) खुली प्रश्नावली
ब) प्रश्नावली
क) औपचारिक प्रश्नावली
ड) बंदिस्त प्रश्नावली

१४. साहित्यभाषेच्या स्वरूपाविषयी सिद्धान्तन, तंत्र आणि सौंदर्यात्मकरूप या गोष्टी कोणत्या समीक्षा पद्धतीत अपेक्षित असतात?

अ) आस्वादक समीक्षा
ब) मार्क्सवादी समीक्षा
क) समाजवादी समीक्षा
ड) रूपवादी समीक्षा

१५. भाषिक प्रयोग व भाषिक क्षमता यांमध्ये भेद कोणी केला आहे?

अ) चोम्स्की
ब) सोस्युर
क) हेगेल
ड) हॉन्ले

१६. 'समीक्षेची वल्कले' हा समीक्षाग्रंथ कोणी लिहिला आहे?

अ) द. भि. कुलकर्णी

ब) दा. वि. कुलकर्णी

क) रा. भा. पाटणकर

ड) धो. वि. देशपांडे

१७. उपलब्ध ग्रंथाकडून मूळ ग्रंथरूपाचा शोध खालील चिकित्सा पद्धतीत घेतला जातो.

अ) ग्रंथचिकित्सा

ब) समीक्षाशोध

क) पाठचिकित्सा

ड) हस्तलिखिताचे

१८. आंध्र प्रदेश साहित्य परिषदेद्वारा कोणते नियतकालिक चालवले जाते.

अ) अनुबंध ब) प्रतिष्ठान

क) युगवाणी ड) पंचधारा

१९. भाषेविषयी असणाऱ्या भाषेचा वापरास कोणत्या संज्ञेचा वापर केला जातो?

अ) प्रादेशिक भाषा

ब) प्रमाणभाषा

क) अति-भाषा

ड) बोलीभाषा

२०. कोणत्याही प्रबंधलेखनात कोणत्या प्रकारचे अभिप्राय निष्कर्ष म्हणून स्वीकारले जात नाहीत?

अ) वैयक्तिक ब) समीक्षात्मक

क) तर्काधिष्ठीत ड) तौलनिक

२१. मौखिक संहिता ही खालीलपैकी कोणत्या प्रकारची संहिता असते?

अ) आभासी ब) लिखित

क) चल ड) अचल

२२. युक्तिवादात्मक निबंध कशाप्रकारचा असतो?

अ) खंडण-मंडणात्मक ब) वर्णनपर

क) प्रयोगात्मक ड) भावनात्मक

२३. प्रबंध लेखनाच्या भाषेत व्याकरणिक संगती असेल तर कोणत्या प्रकारची संगती लागू शकते?

अ) भावानुवादची ब) आशयाची

क) स्वैर कल्पनाविलासाची ड) अनुवादाची

२४. प्रबंध लेखनाच्या भाषेचे स्वरूप कशाप्रकारचे असावे?

अ) संदिग्ध ब) अलंकारिक

क) कल्पनाप्रचुर ड) वस्तुनिष्ठ

२५. 'भारतीय साहित्यशास्त्र' हा ग्रंथ खालीलपैकी कोणत्या समीक्षकांनी लिहिला आहे?

अ) शरद पाटील ब) म. द. हातकणंगलेकर

क) गंगाधर गाडगीळ ड) डॉ. ग. त्र्यं. देशपांडे

२६. 'तृष्णेचे काव्यशास्त्र' ही महत्त्वपूर्ण संकल्पना कोणी उपयोजिलेली आहे?

अ) सुधीर रसाळ ब) कमलाकर नाडकर्णी

क) म.सु.पाटील ड) त्र्यं. वि. सरदेशमुख

२७. 'करितो कवित्त्व म्हणाल हे कोणी। नव्हे माझी वाणी पदरीची।।' असे कोणत्या संतांनी म्हटले आहे?

अ) संत तुकाराम ब) संत सावता माळी

क) संत गोरा कुंभार ड) संत रामदास

२८. 'गावगाडा' या बहुचर्चित ग्रंथाचे लेखन कोणत्या लेखकाने केले आहे?

अ) त्रिंबक नारायण आत्रे
ब) साने गुरूजी
क) आनंद यादव
ड) र. वा. दिघे

२९. 'कलगीतुरा' हा शब्द कोणत्या कलाप्रकाराशी संबंधित आहे?

अ) पोवाडा
ब) अभंग
क) लावणी
ड) दिंडी

३०. कोणत्या नियतकालिकातून दलित समाजाच्या प्रश्नांची चर्चा सातत्याने करण्यात आली आहे?

अ) मुक्तशब्द
ब) अस्मितादर्श
क) साधना
ड) ललित

३१. संशोधनाच्या अंतिम टप्प्यात निरीक्षणांची व निष्कर्षांची नोंद कोणत्या घटकात केली जाते?

अ) प्रास्ताविक
ब) साघनग्रंथ
क) उपसंहार
ड) संपादकीय

३२. पाश्चात्य देशात मुद्रणकलेचा शोध लागेपर्यंत लाकडी पट्ट्यांचे पुस्तक तयार करीत त्यास काय म्हणत?

अ) हार्न बुक
ब) बायडिंग बुक
क) वुडन बुक
ड) हुक बुक

३३. भरतमुनी यांनी लिहिलेल्या कोणत्या ग्रंथात रस विचाराची विस्तृत चर्चा करण्यात आली आहे?

अ) नाट्यशास्त्र
ब) काव्यप्रकाश
क) काव्यशास्त्रप्रदीप
ड) रसशास्त्र

३४. 'खबर' या अरबी शब्दाचा वर्णविपर्यय होऊन कोणता हा शब्द निर्माण झाला असावा, असे म्हटले जाते?

अ) बातमी
ब) बखर
क) निवेदन
ड) वार्ता

३५. पौराणिक प्रसंगांची चित्रे दाखवून कथाकथन करण्याच्या पद्धतीस काय म्हटले जाते ?

अ) चित्रकथी

ब) चित्राकाश

क) चित्रशाळा

ड) चित्रकाव्य

३६. आदिवासी मराठी साहित्य: स्वरूप आणि समस्या' या ग्रंथाचे संपादन कोणी केले आहे?

अ) विनायक तुमराम
ब) प्रमोद मुनघाटे
क) वाहरू सोनावणे
ड) भुजंग मेश्राम

३७. भारतातील बोलींवर आणि जिवंत व नष्ट होत चाललेल्या ७८० भाषांवर संशोधन करून लिहिलेला 'पीपल्स लिंग्विटिक सर्व्हे ऑफ इंडिया' नावाचा ग्रंथ कोणी प्रसिद्ध केला आहे?

अ) जॉर्ज ग्रियर्सन

ब) डॉ. सियाराम तिवारी

क) अ. रा. कुलकर्णी

ड) गणेश देवी

३८. 'शाहिरी काव्य म्हणजे पोवाडा आणि लावणी या जोडप्याचा संसार होय. लौकिक जीवनात पुरेपुर रस घेऊन शाहिरांनी हा संसार सजविला.' असे कोणी म्हटले?

अ) ल. रा. नसिराबादकर
ब) म. ना. अदवंत
क) ह. श्री. शेणोलीकर
ड) म. वा. धोंड

३९. 'ज्या साहित्याला सम्यक परिवर्तन अभिप्रेत आहे व जे साहित्य क्रांतीला सामोरे जाते ते दलित साहित्य' अशी दलित साहित्याची व्याख्या कोणी केली आहे?

अ) नामदेव ढसाळ
ब) बाबूराव बागूल
क) केशव मेश्राम
ड) सदा कहाडे

४०. दशावतार हा लोकसाहित्यप्रकार कोठे आढळतो?

अ) दक्षिण कोकण
ब) खाणदेश
क) विदर्भ
ड) पश्चिम महाराष्ट्र

४१. पितृसत्ताक समाजव्यवस्था हे स्त्रियांच्या शोषणाचे आदिकारण आहे, असे सांगणारा 'सेक्शुअल पॉलिटिक्स' हा ग्रंथाच्या लेखिका कोण?

अ) सिमोन द बोव्हार
ब) केट मिले
क) गिल्बर्ट ग्यूबर
ड) मोई तोरील

४२. 'चलत् चित्रव्यूह' हा ग्रंथ कोणत्या लेखकाने लिहिला आहे?

अ) अरुणा अंतरकर
ब) अरुण खोपकर
क) अरुण कोलटकर
ड) अरुण सरनाईक

४३. 'सीतायन' हा ग्रंथ कोणत्या लेखिकेने लिहिलेला आहे?

अ) उल्का महाजन
ब) अनुराधा पोतदार
क) अरूणा ढेरे
ड) डॉ. तारा भवाळकर

४४. 'जांभूळ आख्यान' या लोकनाट्याचे सादरीकरण कोणत्या लोककलावंताने केले आहे?

अ) शाहीर पिराजीराज सरनाईक
ब) शाहीर विठ्ठल उमप
क) शाहीर रामजोशी
ड) शाहीर बाबासाहेब पुरंदरे

४५. 'विवादे विषादे प्रमादे प्रवासे' ही कादंबरी कोणत्या लेखकाने लिहिली आहे?

अ) प्रशांत बागड
ब) बालाजी सुतार
क) आसाराम लोमटे
ड) आनंद विंगकर

४६. 'आयदान' या आत्मचरित्राचा इंग्रजी अनुवाद कोणी केला आहे?

अ) उषा हस्तक
ब) लीना सोहनी
क) माया पंडित
ड) उमा कुलकर्णी

४७. 'मौनराग' हे कोणत्या लेखकाने लिहिलेले ललित गद्याचे पुस्तक आहे ?

अ) महेश एलकुंचवार
ब) जी. ए. कुलकर्णी
क) किरण गुरव
ड) गंगाधर गाडगीळ

४८. गंगाधर गाडगीळ यांनी लिहिलेल्या आत्मचरित्राचे नाव काय आहे?

अ) आठवणींचे पक्षी

ब) एक झाड दोन पक्षी

क) बलुतं

ड) एका मुंगीचे महाभारत

४९. 'उदाहरणार्थ कोसला' या ग्रंथाच्या लेखकाचे नाव काय आहे ?

अ) वासुदेव सावंत

ब) नागनाथ कोत्तापल्ले

क) हरिश्चंद्र थोरात

ड) सतीश तांबे

५०. मृत्यूविषयक चिंतनाला शब्दरूप देणाऱ्या काव्याला कोणत्या नावाने संबोधले जाते ?

अ) निर्वेदी

ब) विलापिका

क) हायकू

ड) गझल

◆◆◆

- ROUGH WORK -